# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

नविन प्रशासकीय इमारत, स्व. धर्मवीर आनंद दिघे चौक , भिवंडी – ४२१३०२, जि. ठाणे

दूरध्वनी क्र. : ०२५२२-२५५३१४/२५५३१५, E-Mail – bncmc.cd@gmail.com


जा.क्र./भिनिशमनपा/अ.बां.व अ.नि.वि./१६५/२०२५ दिनांक ३१/१ /२०२५

## स्वारस्य अभिव्यक्ती (EOI-EXPRESSION OF INTEREST)

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, धोकादायक / अतिधोकादायक इमारती, रस्ता रुंदीकरणातील बाधित होणाऱ्या मिळकती (मुल्यांकन रक्कमेवर जास्तीत जास्त स्वामीत्व धन (Royalty) महापालिकेकडे भरणा करणेस तयार असणाऱ्या) **निष्कासित** करणेकामी साधनसामुग्रीने सुसज्ज ठेकेदारांचे प्रभागनिहाय पॅनल तयार करणेकरीता अनुभवी ठेकेदारांकडून स्वारस्याची अभिरुची (EOI) मागविण्यात येत आहेत. स्वारस्याची अभिरुची (EOI) मध्ये भाग घेण्याची शेवटची **दिनांक ०७/०२/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत** आहे. इच्छुक ठेकेदारांनी demolition.bncmc@gmail.com ह्या ई-मेलवर, टपालाने किंवा स्वहस्ते विहीत वेळेत व नमुन्यात आपले प्रस्ताव सादर करावे.

स्वारस्याची अभिरुची (EOI) दस्ताऐवज महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.bncmc.gov.in वर उपलब्ध आहेत.

३१.१.२५

(स्वाक्षरी)

उपआयुक्त (अ.बां. व अति. नि.)

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

**टीप :- "याकामी वेग-वेगळे दर प्राप्त झाल्यास उच्चतम दर (H-१) प्राप्त होतील त्याच दराने रॉयल्टी भरणा करणे अन्य दर क्वोट केलेल्या कंत्राटदारांना बंधनकारक राहील."**

**अ.१) थोडक्यात परिचय**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक /अतिधोकादायक मिळकतींची संख्या जास्त असून कोणतीही दुर्घटना घडून जिवीत वा वित्तहानी होऊ नये या दृष्टिकोनातून सदरच्या मिळकती निष्कासित करणे आवश्यक आहे, तसेच मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, रस्तारुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती यांना देखील निष्कासित करणे गरजेचे असल्याने उपरोक्त मिळकती निष्कासित करणेकामी मुल्यांकन रक्कमेवर जास्तीत जास्त स्वामीत्व धन (Royalty) महापालिकेकडे भरणेस तयार असणाऱ्या साधनसामुग्री आणि मनुष्यबळाने सुसज्ज अशा अनुभवी ठेकेदार यांचेकडून स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्यात येत आहेत.

**अ.२) स्वारस्य अभिव्यक्तीचे उद्दिष्ट**

एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) च्या या आमंत्रणाचा उद्देश आहे.

१. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक / अतिधोकादायक मिळकती, अनधिकृत बांधकामे, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती महापालिकेकडे निष्कासित करणे.
२. याकामी साधनसामुग्री व कुशल मनुष्यबळासह सुसज्ज अशा अनुभवी ठेकेदारांची निवड करणे.

सदर स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज मध्ये कामाचे स्वरूप, कामाची व्याप्ती, पात्रता आवश्यकता, प्रपत्रे आणि इच्छुक सहभागीसाठी प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया नमूद करण्यात येत आहे. निकषांची पूर्तता करणारे अर्ज केवळ मूल्यांकन केले जातील आणि निवड केलेले संस्थांना नियुक्त केले जाईल भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कोणत्याही टप्यावर कोणत्याही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते, प्रक्रियेचे कोणतेही कारण न देता आणि त्यावर कोणताही दावा / प्रतिदावे स्वीकारले स्वीकारले जाणार नाहीत.

**अ. ३) कामाची व्याप्ती**

१. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ क्षेत्रातील धोकादायक / अतिधोकादायक मिळकती, अनधिकृत बांधकामे, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती महापालिकेकडे निष्कासित करणे.
२. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ क्षेत्रातील धोकादायक / अतिधोकादायक मिळकती, अनधिकृत बांधकामे, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती महापालिकेकडे निष्कासित करणेसाठी महापालिकेने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमावलीचे पालन न झाल्यास कायदेशीर प्रश्न उद्भवल्यास त्यास कंत्राटदार स्वतः जबाबदार राहील.
३. निष्कासनाकामी संपूर्ण साधनसामुग्री खर्च, वाहन खर्च, इंधन खर्च, मनुष्यबळ खर्च करण्याची जबबाबदारी नियुक्त होणाऱ्या संस्थेची राहील. या करिता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
४. वेळोवेळी जारी केलेले इतर कोणतेही निर्देश अथवा सूचना ह्या नियुक्त संस्था यांना बांधील राहतील.
५. “याकामी वेग-वेगळे दर प्राप्त झाल्यास उच्चतम दर (H-१) प्राप्त होतील त्याच दराने रॉयल्टी भरणा करणे अन्य दर क्वोट केलेल्या कंत्राटदारांना बंधनकारक राहील.”

**अ. ४) कार्यक्रमाचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| स्वारस्य अभिव्यक्ती चे प्रकाशन | दिनांक ०१/०२/२०२५ सकाळी ११.०० वाजे पासून ते दिनांक ०७/०२/२०२५ दुपारी ३.०० वाजे पर्यंत |
| स्वारस्य अभिव्यक्ती चे कागदपत्र छाननी | ११/०२/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| पूर्व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या स्वारस्य अभिव्यक्तीतील पात्र संस्थांचे सादरीकरण | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |
| स्वारस्य अभिव्यक्तीतील पात्र संस्थेची निवड व घोषणा | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

**अ. ५) निवड पध्दती**

स्वारस्य अभिव्यक्ती द्वारे मागवण्यात आलेले प्रस्ताव यांची छाननी समिती विहित नमुन्यात मागविलेले कागदपत्रे यांचे मूल्यमापन करून निवड यादी घोषित करण्यात येईल तरी पूर्व पात्रता निकष असणे गरजेचे आहे. सदर निविदा समितीचा निर्णय अंतिम राहील.

**अ. ६) पात्रता निकष**

१) नोंदणी पत्राची सत्य प्रत
२) पीएफ क्रमांक
३) पॅन कार्डचा छायांकित प्रत
४) जी. एस. टी. रजीस्ट्रेशन
५) ई.पि.एफ.रजिस्ट्रेशन
६) अनुभव प्रमाणपत्र
७) Non Black Listed Affidavit
८) Company Profile

**अ. ७) मुल्यमापन निकष**

अर्जदार संस्था ज्यांनी पूर्व पात्रता निकष पूर्ण केले आहेत त्यांचे मुल्यमापन, तांत्रिक मुल्यमापन निविदा समिती द्वारे करण्यात येईल.

**अ. ८) गुणपत्रिका**

| **मुल्यमापन निकष** | **कमाल गुण संख्या** | **मिळालेले गुण** |
|---|---|---|
| इमारत निष्कासन कामाचा अनुभव | **२०** | |
| कार्यक्षम आणि उच्च दर्जाची किमान यंत्रणा | **२०** | |
| कंपनी प्रोफाईल | **२०** | |
| साधनसामुग्री व मनुष्यबळ | **२०** | |
| एकूण | **८०** | |

★निवड होण्यासाठी, सहभागीला किमान ३० गुण मिळणे आवश्यक आहे (अट शिथिल करण्याचे सर्व अधिकार निविदा समितीकडे राहतील.)

**ब) सहभाग घेणाऱ्या संस्थांना सुचना**

**ब.१) स्वाक्षरीदार अधिकृत (AUTHORIZED SIGNATURE)**

EOI स्वायत अभिरुची चे अर्ज सादर करताना सादरकर्ता हा त्या संस्थेचा अधिकृत स्वाक्षरीदार असावा तसेच सर्व दस्तावेज व प्रमाणपत्रे हे अधिकृत स्वाक्षरीदार यानेच प्रमाणित करून पाठवाव्यात. संपूर्ण पत्र व्यवहार हा संस्थेकडून होताना हा अधिकृत स्वाक्षरीदार मार्फत च स्वीकारला जाईल.

**ब.२) स्वारस्य अभिरुची सादर करणे (SUBMISSION OF EOI)**

सदर स्वारस्य अभिरुची भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या संकेत स्थळ www.bncmc.gov.in वर सदर दस्तावेज उपलब्ध असेल तरी सर्व नमूद केलेले कागदपत्रे प्रपत्र, दस्तावेज, प्रमाणपत्र, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे टपालाने, स्वहस्ते सादर करावेत.

**ब.३) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सोबत लागणारी कागदपत्रे**

स्वायत अभिरुची (EOI) दाखल करणाऱ्या संस्थांनी खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत

१. अधिकृतता पत्र (Letter of Authorization)
२. प्रपत्र १ प्रस्तावाचा नमुना प्रपत्र
३. प्रपत्र २ पूर्व-पात्रता निकष (Pre-Qualification Criteria)
४. प्रपत्र ३ इमारती निष्कासन कामाचा अनुभवाचा तपशील
५. प्रपत्र ४ प्रतिज्ञापत्र किंवा स्व-घोषणा
६. मूल्यमापन निकर्षानुसार अतिरिक्त समर्थन करणारे दस्तऐवज अथवा कागदपत्रे.
७. मागिल तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR Returns), ताळेबंद विवरण (Account And Balance Sheet)
८. इतर कोणतीही माहिती अर्जदाराला त्यांचे दावे सिद्ध करण्यासाठी सादर करावयाचे असल्यास सोबत जोडावेत.

स्वारस्य अभिरुची चे सर्व दस्तावेज हे अन. बांध. व अति. निष्का. विभाग, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे टपालाने, स्वहस्ते सादर करावेत.

**ब.४) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मध्ये सुधारणा**

स्वारस्य अभिव्यक्ती मध्ये स्वताहून अथवा संस्थे मार्फत काही त्रुटी निदर्शनास आल्यास सदर स्वारस्य अभिव्यक्ती मध्ये सुधारणा करण्याचे संपूर्ण अधिकार हे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका राखून ठेवीत आहे. तसेच अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख बदलण्याची संपूर्ण अधिकार हे अबाधित राहतील.

**ब.५) अर्जासाठी प्राथमिक परीक्षा**

१) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका आलेल्या सर्व अर्जाची छाननी करेल.
२) सदर अर्जामध्ये काही त्रुटी असतील पण त्या सदर कार्यक्रम राबविण्याकरिता अति महत्वाच्या बाबी नसल्यास त्या त्रुटी दुर्लक्षित करण्याचे संपूर्ण अधिकार निविदा समितीस राहतील.
३) अर्जदारांचे मुल्यांकन हे उपलब्ध माहिती नुसार केले जाईल. तरी जर अधिक स्पष्टीकरण लागणार असेल तर तसे मागविण्याचे संपूर्ण अधिकार निविदा समितीकडे राहतील.

**ब.६) अर्जाचे मूल्यमापन**

अर्जाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया खाली दर्शविली आहे.

१. स्वायत अभिरुची (EOI) मध्ये पूर्व-पात्रता निकष निर्दिष्ट केले आहेत त्या प्रमाणे अर्जदाराने प्रस्तावित कागदपत्रे त्याच क्रमाने सादर करावेत.
२. केवळ सहभागी, जे पूर्व पात्रता निकष पूर्ण करतात, त्यांचे नमूद केलेल्या मूल्यमापन निकषानुसार निवडीसाठी मूल्यांकन केले जाईल.
३. मुल्यमापनात किमान ५० गुण मिळवणाऱ्या सहभागीना शॉर्ट लिस्टिंगसाठी विचारात घेतले जाईल. तसेच सदर अट शिथिल करण्याचे सर्व अधिकार निविदा समितीकडे राहतील.

**ब.७) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) नाकारणे.**

अर्ज नाकारला जाण्यास खालील कारणाने केले जाईल :

अ) अर्ज विहित नमुन्यात नाही आणि त्यात सर्व आवश्यक तपशील नाहीत.

ब) देय तारीख आणि वेळ संपल्यानंतर प्राप्त होणारे अर्ज

क) स्वायत अभिव्यक्ती (EOI) सोबत योग्य सहाय्यक कागदपत्रे नाहीत.

**ब.8) अस्वीकरण (disclaimer)**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कोणत्याही अर्जाच्या उशीरा प्राप्तीसाठी जबाबदार राहणार नाही. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**ब.9) प्रस्तावित अटी व शर्ती पुढील प्रमाणे-**

१) नोंदणी पत्राची सत्य प्रत
२) पीएफ क्रमांक
३) पॅन कार्डचा छायांकित प्रत
४) जी. एस. टी. रजीस्ट्रेशन
५) ई.पि.एफ.रजिस्ट्रेशन
६) अनुभव प्रमाणपत्र
७) Non Black Listed Affidavit
८) ठेकेदाराकडे निष्कासनकामाकरिता कार्यक्षम आणि उच्च दर्जाची किमान यंत्रणा असणे आवश्यक असून त्यामध्ये Pock lain's, JCB's, Chipping Hammer, Hydraulic Concrete Crusher, Steel Wire Rope, Hydraulic Splitter, Demolition Hammer, Mounted Breakers, Hydraulic Hammer, Pneumatic Hammer या अत्याधुनिक साधन सामुग्रीसह कुशल मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.
९) महानगरपालिकेकडून Offset Value (Offset Price) निश्चित केल्यानंतर इमारत निष्कासनापूर्वी सदरची रक्कम भरणा करावयाची आहे.
१०) अनाधिकृत / बिगर परवाना बांधकाम निष्कासन काम सुरु करण्यापूर्वी संबंधीत प्रभाग समितीचे सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, कनिष्ठ भियंता तथा शहानिशा अधिकारी, बिट निरिक्षक तथा सहा पदनिर्देशित अधिकारी यांना अवगत करुन पाणीपुरवठा, वीज पुरवठा खंडीत केल्याची खात्री केल्यावरच कायदेशिर बाबीची पूर्तता केल्याचे निर्देश मिळाल्या नंतर निष्कासनाची कारवाई सुरु करावी.
११) निष्कासन करताना इंडियन स्टैंडर्ड डिमोलेशन ऑफ बिल्डींग कोड ऑफ सेप्टीचे पालन करणे संबंधीतावर बंधनकारक असेल.
१२) निष्कासनाच्या वेळीस कामगार, कर्मचारी, नागरिक, कंत्राटदाराकडील सर्व मनुष्यबळ इत्यादींसाठी सुरक्षिततेच्या सर्व उपाय योजना करणे संबंधीतावर बंधनकारक राहील.
१३) नियमांच्या तरतुदींनुसार शासकिय संस्थेकडून विमा काढण्याची जबाबदारी संबंधीतावर राहील.
कामगार कायदयाचे व इतर सर्व कायदयांचे पालन करणे संबंधीतावर बंधनकारक राहील.
१४) महानगरपालिकेने दिलेल्या कार्यादेशातील व ज्या इमारतीबाबत निष्कासन करावयाचे आदेशित केले आहे. तीच इमारत निष्कासन करणे संबंधीतावर बंधनकारक असेल.
१५) इमारत निष्कासन करताना कोणतीही आर्थिक व जिवीत हानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी.
१६) जर अशी कोणतीही जिवीत व वित्त हानी झाल्यास त्यास संबंधित ठेकेदार जबाबदार राहील.
१७) इमारत निष्कासन करण्यापूर्वी ज्याभागात सदरील इमारत आहे त्या परिसरातील सर्व नागरिकांना व ज्या नागरिकांना इमारत निष्कासन करताना त्रास होण्याची शक्यता आहे अशा सर्वांना निष्कासनाचे काम सुरु करण्यापूर्वी अवगत करून सुरक्षिततेसाठी बाहेर काढण्यात यावे.
१८) **धोकादायक स्थितीत असणाऱ्या मनपा स्वमालकीच्या मिळकती जसे की, शौचालये, कार्यालये, सांस्कृतिक केंद्रे, हॉल, निवासस्थाने (वसाहती), उड्डाणपूल, मनपा शाळा, पाण्याची टाकी इ. मनपाच्या बांधकाम विभागामार्फत मुल्यांकन करून त्यास मा. आयुक्त सो. किंवा सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी प्राप्त झालेनंतरच अशा मिळकती संबंधित कंत्राटदारास निष्कासित करता येतील.**
१९) दिलेल्या आदेशातील इमारतीस निष्कासनाच्या वेळी जे साहित्य निघेल ते स्वखर्चाने इतरत्र हलविणे त्यामुळे नागरिकांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे व इमारत निष्कासन दरम्यान निघणारे सर्व साहित्य उचलण्याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घेऊन पूर्णत: निष्कासित करून भुईसपाट केलेल्या मिळकतीच्या डेब्रिसची विल्हेवाट घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अन्वये लावणेची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असेल. अशा प्रकारे डेब्रिस (C&D Waste) पडलेले आढळून आल्यास कंत्राटदारास प्रत्येक दिवसाकरीता रक्कम रुपये ५०००/- दंड आकारण्यात येईल व सदर दंडाची रक्कम त्या इमारतीच्या मुल्यांकन रक्कमेत समायोजित करण्यात येईल. कंत्राटदारास मुल्यांकन रक्कम व दंडाची रक्कम भरणा करणे बंधनकारक असेल.
२०) संबंधित प्रभाग अधिकारी यांनी इमारत निष्कासनाचा कार्यादेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०२ दिवसांच्या आत कामास सुरूवात न केल्यास ठेकेदार यांना दिलेला कार्यादेश रद्द करण्यात येईल.
२१) कंत्राटदारास लावण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या दंडाची रक्कम मनपाचे लेखा विभागात भरणा करणे बंधनकारक असेल. कंत्राटदाराने कार्यादेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०२ दिवसांचे आत काम सुरू न केल्यास सदरचे काम अन्य ठेकेदारास वर्ग करण्यात येईल व त्याबाबत ठेकेदारास कोणत्याही प्रकारची (न्यायालयीन दाद) मागता येणार नाही.
२२) दंड माफ करणे वा त्याबाबत उचित निर्णय घेणेचे अधिकार मा. आयुक्त यांचेकडे आहेत.
२३) अतिधोकादायक मिळकती निष्कासित करतेवेळी आवश्यक असणारी वीज जोडणी कंत्राटदाराने स्वखर्चाने प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील याकामी कंत्राटदाराने मागणी केल्यास मनपामार्फत ना हरकत देण्यात येईल.

२४) निष्कासित करावयाच्या इमारतीचे आजुबाजुच्या इमारती, घरे, झोपडे झाडे व रस्ता इत्यादी यांना धोका होणार नाही याची काळजी घेणे

२५) सदरील इमारतीचे निष्कासनाचे सर्व साहित्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबंधीतावर राहील. सदरील इमारत भुईसपाट करण्याची जबाबदारी संबंधीतावर राहील.

२६) इमारतीचे निष्कासन कारवाई दरम्यान वापरण्यात येणारे साहित्य मशिनरी यांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील. इमारत निष्कासन कारवाई सुर्योदय ते सूर्यास्त म्हणजे दिवस भरात करणे.

२७) इमारत निष्कासन कारवाई करते वेळी कायदा व सुव्यवस्थेकामी पोलीस बंदोबस्त घेतल्यास पोलीस बंदोबस्ता बाबतचे शुल्क देणे ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहील.

२८) निष्कासनाच्या वेळी काही परवानग्या लागल्यास त्या घ्यावयाची जबाबदारी संबंधित ठेकेदार यांचेवर राहील त्यासाठी आवश्यक ते वाजवी सहकार्य केले जाईल.

२९) निष्कासनाच्या वेळी निघणारे साहित्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा मोबदला महानगरपालिकेकडून कंत्राटदार घेणार नाही. महानगरपालिकेच्या ना-हरकत दाखल्याची हरकत भासल्यास ते घेणे संबंधीतावर बंधनकारक असेल.

३०) निष्कासन कारवाई सुरु केल्यानंतर सदरील इमारती/मिळकती भुईसपाट करण्याची जबाबदारी संबंधितांवर राहील. करारनाम्यात नमूद अटी व शर्ती बदलाचे अधिकार मा. आयुक्त भिवंडी नि.श. महानगरपालिका यांना राहतील.

३१) करारनाम्यातील व मा. आयुक्तांकडुन वेळोवेळी देण्यात येणा-या पत्रातील, कार्यादेशातील अटी व शर्ती संबंधीतांना मान्य असतील व बंधनकारक असतील.

३२) पत्रात / कार्यदेशात कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. (भिवंडी नि. श. मनपा) यांनी राखून ठेवलेले आहेत. सदरील अटी व शर्ती संबंधीत आपल्या राजीखुषीने करार नाम्यात नमुद करणे संबंधीतावर बंधनकारक असेल.

३३) इमारत तोडणे अगोदर संपूर्णपणे निर्मनुष्य झाली आहे याची खात्री संबंधित कंत्राटदाराने व त्याच्या जबाबदार सुपरवायझरने करणे आवश्यक असून तसे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

३४) इमारत पाडण्याअगोदर आवश्यक तेथे इमारतीचा स्ट्रक्चरल, vibrations चा अभ्यास सदर कंत्राटदाराने आवश्यक तेथे स्ट्रक्चरल तज्ञांचा सल्ला स्वखर्चाने घेण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहील.

३५) इमारतीचे बांधकाम कधी झाले, कोणत्या गुणवत्तेचे झाले, त्याचे फाउंडेशन पाया कशा प्रकारचा आहे. या बाबत महापालिकेकडे कोणतीही माहिती 'उपलब्ध नाही हे विचारात घेऊन सुरक्षिततेच्या आवश्यक त्या सर्व उपायोजना संबंधित कंत्राटदार यांनी करणे आवश्यक राहील.

३६) इमारत पाडण्याची कार्यवाही करत असताना ॲक्सिडेंटल लोड चा इम्पॅक्ट व कॉलिजन इम्पॅक्ट चा अभ्यास करून त्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी, आजूबाजूचे नागरिक, काम करण्यासाठी वापरण्यात येणारी वाहने, अन्य मशिनरी आणि आसपासच्या इमारती यांची सुरक्षितता, सेफ्टी बाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहिल.

३७) इमारत पाडण्यासाठी लागणारी वाहने, उपकरणे सुस्थितीत असावीत त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३८) एखादी अतिधोकादायक मिळकत निष्कासित करणेपूर्वी, निष्कासन करीत असतांना व निष्कासन पूर्ण झालेनंतर संपूर्णत: भुईसपाट केल्याचे GEO TAG फोटो संबंधित प्रभाग समितीचे सहा. आयुक्त व बिट निरीक्षक यांचेकडे जमा करणेची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असेल.

३९) कंत्राटी कामगारांच्या देय लाभावावत किमान वेतन कायद्यातील EPF व अन्य कायद्यातील तरतुदींचे पालन करणेची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

**४०)ज्या ठेकेदारास मनपा पॅनलवर नियुक्त केले जाईल त्याने रक्कम रु. ०५ लक्ष अनामत स्वरुपात मनपाकडे जमा करणे बंधनकारक असेल.**

४१) अतिधोकादायक मिळकत निष्कासित करणेचे काम सुरू करून पुढील स्वामीत्व धनाची रक्कम कंत्राटदाराने महापालिकेस अदा करावी व तसे न केल्यास एकूण मुल्यांकनाची रक्कम कंत्राटदाराने जमा केलेल्या अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल. त्याचप्रकारे असा प्रकार वारंवार आढळून आल्यास सदरचे काम अन्य ठेकेदारास वर्ग करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारास देण्यात आलेले काम रद्द केले असे समजण्यात येईल.

४२) सदरचे पॅनलवरील नियुक्ती ही आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीकरीता असेल.

31.1.25

(स्वाक्षरी)

उपआयुक्त (अ.बां. व अति. नि.)

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

प्रपत्र १

**स्वारस्य अभिरुचीच्या प्रस्तावाचा नमुना**

प्रति,
मा. प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,
भिवंडी, जि. ठाणे

विषय :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक / अतिधोकादायक मिळकती, अनधिकृत बांधकामे, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती स्वामीत्व धन भरणेच्या अटीवर निष्कासित करण्याकरिता स्वायत्त अभिव्यक्ती सादर करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार, खाली स्वाक्षरी केलेल्यांनी स्वारस्य अभिव्यक्ती (EIO) संबंधित सर्व दस्ताऐवजांचे तपशीलवार वाचन आणि परिक्षण केले आहे तसेच तुमच्या कार्यक्षेत्रात निर्दिष्ट कामाकरीता काम करण्यासाठी याद्वारे स्वारस्य व्यक्त करत आहोत.

| अ.क्र. | वर्णन | शेरा |
|---|---|---|
| १ | सहभागी संस्थेचे नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | व्यक्तीचे नाव, पद आणि पत्ता (Authorized Signature) | |
| ४ | दुरध्वनी क्रमांक | |
| ५ | मोबाईल क्रमांक (संपर्क व्यक्ती) | |
| ६ | संस्थेचा ई - मेल आयडी | |
| ७ | ई — आयडी (संपर्क प्रमुख) | |
| ८ | स्वामीत्व धनाचे सादर केलेले दर | |

(टीप :- स्वामीत्व धनाचे (Royalty) दर टक्केवारीत लिहावते)

मी/आम्ही खालील प्रमाणे कागदपत्रे सोबत जोडले आहेत.

१. अधिकृतता पत्र (Letter of Autorisation)
२. संस्थेच्या लेटर हेडवर योग्य रित्या सीलबंद आणि अधिकृत व्यक्तीने स्वाक्षरी केलेला अर्ज (प्रपत्र १)
३. पूर्व पात्रता निकष (प्रपत्र २)
४. निष्कासन कामातील अनुभवाचे दस्ताऐवज (प्रपत्र ३)
५. अर्जदाराबद्दल तपशिल (प्रपत्र ४)
६. प्रतिज्ञापत्र/स्व-घोषणापत्र
७. आवश्यक कागदपत्रांच्या स्व-प्रमाणित प्रती (Attested Copy Of Supporting Documents)
८. मागील तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR Returns), ताळेबंद विवरण (Account And Balance Sheet)

मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की, माझा/आमचा स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सद्भावनेने केला आहे आणि त्यात असलेली माहिती ही खरी आहे.

आपला विश्वासु
सही
पद
शिक्का
दिनांक ________वेळ______

प्रपत्र २

## पूर्व-पात्रता निकष

| अ.क्र. | विवरण | शेरा |
|---|---|---|
| १ | नोंदणी पत्राची सत्य प्रत | |
| २ | पीएफ क्रमांक | |
| ३ | पॅन कार्ड छायांकित प्रत | |
| ४ | जी.एस.टी. रजिस्ट्रेशन | |
| ५ | ई.पि.एफ. रजिस्ट्रेशन | |
| ६ | निष्कासन कामाचे अनुभवाचे दस्ताऐवज | |
| ७ | काळया यादीत नसल्याबाबतचे हमीपत्र | |
| ८ | Company Profile | |
| ९ | मागील तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR Returns) | |
| १० | ताळेबंद विवरण (Account and Balance Sheet) | |
| ११ | अट क्र. ८ मध्ये नमूद साधनसामुग्रीचा तपशिल | |

अर्जदाराची स्वाक्षरी

प्रपत्र ३

**निष्कासन कामाचे अनुभवाचे तपशिल**

इमारती निष्कासन कामाच्या अनुभवाचे तपशिल आणि पूर्ण झालेल्या / हाता असलेल्या प्रकल्पांची माहिती.

| अ.क्र. | निष्कासन काम केलेल्या संस्थेचे नाव (Name of Hiring Authority) | स्वायत्त संस्थेचा पत्ता व संपर्क तपशिल | कामाचे स्वरुप | निष्कासन केलेल्या इमारतींची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी

टीप :-

वरील प्रमाणे केलेल्या कामांचे कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) सादर करणे आवश्यक आहे.

प्रपत्र ४

## शपथपत्र किंवा स्व-घोषणा

**संदर्भ : स्वारस्य अभिव्यक्ती — भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील धोकादायक / अतिधोकादायक मिळकती, अनधिकृत बांधकामे, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती स्वामीत्व धन भरणेच्या अटीवर निष्कासित करणेबाबत.**

निवड प्रक्रियेत सहभागी होण्यापासून वगळण्यात येईल जर,

१) संस्था किंवा संस्था चालक दिवाळखोरी झाली असल्यास, अथवा न्यायालीन प्रकरणात कर्ज देणाऱ्या सोबत सामंजस्य / अथवा सेटलमेंट झाली असल्यास.

२) त्यांच्या व्यावसायिक वर्तनाशी संबंधित गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले आहे, असे कुठलेही न्यायिक प्रकरण.

३) कोणत्याही मार्गाने सिद्ध झालेल्या गंभीर व्यावसायिक गैरवर्तनासाठी दोषी आहेत, जे करार प्राधिकरण न्याय ठरवू शकते.

४) भ्रष्टाचार, आणि गुन्हेगारी संघटना किंवा इतर कोणत्याही बेकायदेशीर घटकापासून सहभाग समुदायांच्या आर्थिकहित संबंध असल्यास.

५) ह्या आधी इतर प्राधिकरणा सोबत करार केल्या नंतर करार पूर्ण न करताच करार मोडला असल्यास.

६) कुठलाही राजकीय दबाव आणल्यास.

तुमच्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून, मी/आम्ही याद्वारे घोषित करतो कीः

१) मी/आम्ही मला/आम्हाला वरील पैकी कुठलीही परीस्थिती लागू होत नाही.

२) मी/आम्ही व्यवसायातील सर्वोच्च नैतिक मानकांचे पालन करण्यास सहमत आहोत आणि विशेषतः हितसंबंधांचा कोणताही संभाव्य संघर्ष नाही (CONFLICT OF INTEREST);

३) स्वायत अभिव्यक्ती (EOI) प्रक्रियेदरम्यान किंवा अंमलबजावणी दरम्यान कोणत्याही टप्प्यावर वरीलमध्ये काही बदल आढळल्यास मी/आम्ही प्राधिकरणाला ताबडतोब कळवेन.

४) मी/आम्ही पूर्णपणे ओळखतो आणि स्वीकारतो कि, कोणतीही चुकीची किंवा अपूर्ण माहिती जाणून बुजून दिलेली असल्यास स्वायत अभिव्यक्ती (EOI) अर्ज नाकारण्यात येऊ शकतो.

(अर्जदाराची किंवा संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी स्टॅम्प/सीलसह)